# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ८४/२०१३-१४/४६ दिनांक : २६.०५.२०१४

**आदेश- केस क्र.८४/२०१३-१४**

| | |
|---|---|
| डॉ.सारंग हरिभाऊ खापरे,<br>मु.पो.कुंभारी, ता.जत,<br>सांगली-४१६ ४१६. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहाकांळ. | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत. | विरुध्द पक्षकार |

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

डॉ.सारंग हरिभाऊ खापरे, यांचे कुंभारी ता.जत, येथे ५अश्वशक्ती शेतीपंपाचे वीज कनेक्शन आहे. त्यांचा ग्राहक क्र.२७००३०००४०६७ असा आहे. ज्या रोहित्रावरुन वीजपुरवठा केला गेला आहे त्या रोहित्रासाठी उभे केलेले सिमेंटचे खांब धोकादायक असून केव्हाही पडतील अशा स्थितीत आहेत. सदर खांब पडल्यास त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल. येणारी उच्चदाब वाहिनी ही कॅनॉल पार करुन येत आहे. त्यामुळे कोणताही व कोणासही धोका नको यासाठी ही तक्रार करीत असल्याचे म्हटले आहे.

## तक्रारदाराची मागणी

ज्या रोहीत्रावरुन वीजपुरवठा केला जातो ती उच्चदाबवाहिनी सुरक्षित करुन मिळावी या उप्पर ही एखादी अप्रिय घटना या वाहिनीवर घडल्यास वितरण कंपनी जबाबदार असेल याची जाणीव वितरण कंपनीस द्यावी. सिमेंट डांबासभोवताली दगड सिमेंटचे पिचिंग (मफिंग) करुा मिळावे.

तक्रारदाराने सांगली कक्ष येथे दि.२९.११.२०१३ रोजी तक्रार दाखल केली होती. सांगली कक्षने दि.२४.०१.२०१४ रोजी आदेश पारित केला. सदरील आदेशाचे पालन न झाल्याने तक्रारदाराने कोल्हापूर मंच येथे दि.१८.०२.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची सुनावणी दि.१८.०३.२०१४ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री.हरिभाऊ खापरे हे उपस्थित व वि.प.तर्फे श्री.कांबळे,कार्यकारी अभियंता, कवठेमहांकाळ,श्री.पाटील,कनिष्ठ अभियंता हे उपस्थित होते. सदर तक्रारीवरील लेखी निवेदन कार्यकारी अभियंता,कवठेमहांकाळ, यांनी त्यांचे पत्र क्र.१२२३ दि.१५.०३.२०१४ मंचास दि.१८.०३.२०१४ रोजी प्राप्त झाले. त्याची प्रत ग्राहक प्रतिनिधी यांना मिळाल्याची खात्री करण्यात आली.

सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी यांनी उच्चदाब वाहिनीचे सिमेंटचे खांब अपु-या खड्डयामुळे झुकलेल्या अवस्थेत असल्याचे सांगितले. सदर खांबास नियमाप्रमाणे काँक्रिटींग व मफिंग केलेले नाही. अर्थिंग पाईप वर असल्याचे दिसून येते. तारा लुज झाल्यामुळे येणा-या - जाणा-या व्यक्तीस धोका होऊ शकतो. तरी सदरचे खांब सरळ करुन सुरक्षित वीजपुरवठा करावा जेणेकरुन कोणत्याही इसमास धोका होणार नाही.

वि.प.तर्फे श्री.पाटील यांनी सदरील ग्राहकास वीज कनेक्शन देतांना त्यांना लागणारी लघुदाब व उच्चदाब वाहिनी व रोहीत्र केंद्र हे कंपनीच्या नियमाप्रमाणे व सुरक्षिततेच्या मापदंडाप्रमाणे ठेकेदाराकडून उभारणी करण्यात आली असून ते काम विद्युत निरीक्षक, मिरज, यांचेकडून तपासणी करुन विद्युतभारित करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र घेऊन भारित करण्यात आली आहे. संबंधित ग्राहकाची तक्रार प्राप्त झालेनंतर प्रत्यक्ष जागेवर केलेल्या स्थळ पाहणीवरुन सदर रोहित्रचे पोल हे धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेले नाही. विद्युत निरीक्षकाने तपासणी केलेली असल्यामुळे सदरचे पोलला पिचिंग करण्यात यावे ही ग्राहकाची मागणी फेटाळून लावण्यात यावी अशी मंचास विनंती केली.

सुनावणीदरम्यान वि.प.ने स्थळ पाहणी केल्याचे सांगितल्यामुळे मंचाने स्थळतपासणी अहवाल दाखविण्याची मागणी केली. तेव्हा वि.प.ने स्थळतपासणी अहवाल कनिष्ठ अभियंता यांच्याकडून प्राप्त करुन सात दिवसांत मंचास सादर करतो असे सांगितले.

कार्यकारी अभियंता, कवठेमहांकाळ, यांचेकडे मंचाकडून वारंवार मागणी करुन ही स्थळ तपासणी अहवाल व तक्रारीवरील केलेली कारवाईबाबत अहवाल न मिळाल्यामुळे मंच खेद व्यक्त करीत आहे. मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## **आदेश**

१. वि.प.ने ग्राहकाच्या तक्रारीवर गंभीर दखल घेऊन उभी केलेली उच्चदाब, लघुदाब वाहिनी व रोहित्र केंद्र हे कंपनीच्या मापदंडानुसार असल्याची खात्री करावी व नसल्यास योग्य ती दुरुस्तीचे काम करुन घेण्यात यावे जेणेकरुन कोणत्याही इसमास धोका होणार नाही.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :२६.०५.२०१४

सही/-
(जी.बी.पानकर)
सदस्य सचिव

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष